# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) १९४८८ (१४-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ग्रामस्थांना दर्जेदार व नियमित आरोग्य सेवा मिळण्यासाठी ग्रामीण रुग्णालयाची सुसज्ज इमारत बांधून व इमारतीचे लोकार्पण करुन दोन वर्षाचा कालावधी झाला असतानाही येथे नविन डॉक्टरांची व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ग्रामस्थांना सुसज्ज आरोग्य सुविधा आणि औषधेपचार मिळावेत यासाठी डॉक्टर, प्रयोगशाळातंत्रज्ञ, क्षकिरणतज्ञ इत्यादी रिक्त असलेली १२ पदे भरण्याबाबत किती कालावधीत निर्णयात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, सन २०१६ मध्ये सदर ग्रामीण रुग्णालयात गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २५ पदे मंजूर असून त्यापैकी १३ पदे भरलेली व १२ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) संवर्गाचे १ पद रिक्त आहे. ती भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची मंजूर ३ पदे असून १ पद भरलेले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरिता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे बदली/पदोन्नतीने व पदभरतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

**भारतीय चिकीत्सा पदवीधारक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस) यांच्यामधून ॲलोपॅथी (एम.बी.बी.एस) यांची पदे सरळ सेवेने भरण्याबाबत**

**(२) २०५१७ (३१-०७-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय चिकीत्सा पदवीधारक वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस) यांना ॲलोपॅथी (एम.बी.बी.एस) यांचे समकक्ष करण्याचा निर्णय दिनांक २६ मे, १९८१ रोजी घेण्यात येऊन त्यानुसार २५ टक्के पदे उपरोक्त पदवीधारकांमधून सरळ सेवेने भरावीत असा शासनाचा अध्यादेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अध्यादेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, असल्यास राज्यात भारतीय चिकित्सा पदवीधारकांना आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकाऱ्यांना समकक्ष पदावर सामावून घेण्यात आले आहे काय, असल्यास त्यांची संख्या किती आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी सेवा प्रवेश नियम २००० मध्ये राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपलब्ध असलेल्या एकुण मंजुर पदांपैकी २५ टक्के पदे ही बीएएमएस अर्हताधारक उमेदवारामधुन भरण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार बीएएमएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांची पदे नामनिर्देशन तसेच पदोन्नतीद्वारे भरण्यात येतात.

सद्यस्थितीत वैद्यकीय अधिकारी, गट-अ (बीएएमएस) यांची मंजुर पदे ८४० असुन २२५ पदे भरलेली आहेत व ६१५ पदे रिक्त आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागात तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्याबाबत**

**(३) ३६८०१ (१६-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात विशेषत: आदिवासी व दुर्गम भागांत स्त्री रोग तज्ञ, प्रसुती रेडिओलॉजीस्ट, नेत्ररोग तज्ञ, बालरोग तज्ञ, अशा तज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्याने तेथील गरीब रुग्णांना उपचाराकरिता शहरात यावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गामीण रुग्णालयांत अशा किती तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता आहे,

(३) असल्यास, तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य विभागाला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे शासन काही प्रोत्साहनात्मक धोरण अवलंबविणार आहे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात एकुण ३६३ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित असून त्यात स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, भुलतज्ञ ह्या विशेषज्ञांचे प्रत्येकी एक अशी एकुण १०८९ विशेषज्ञांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४४० विशेषज्ञांची पदे भरलेली असून ६४९ विशेषज्ञांची कमतरता आहे. सदर पदांवर ५७१ एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कार्यरत असुन ७८ पदे रिक्त आहेत.

(२) राज्यातील ग्रामीण रुग्णालयात ६४९ विशेषज्ञाची आवश्यकता आहे.

(३) तज्ञ डॉक्टर मिळण्यासाठी सेवांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी पाठविले जाते. तसेच पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना ३/६ अतिरिक्त वेतनवाढी देण्यात येतात. कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधनात रु. १५,०००/- वाढ शासन निर्णय दि. १३ जून २०१९ अन्वये केली आहे.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथील ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत

**(४) ५५५११ (०१-०९-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथील ग्रामीण रूग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पदे रिक्त असून कार्यरत वैद्यकीय अधिकारी सुध्दा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रजेवर गेल्यामुळे या तिन्ही तालुक्यातील आरोग्यसेवा विस्कळीत होऊन रूग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय होऊन रूग्णासह त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची माहिती दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रम्हपूरी, सावली, सिंदेवाही येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रूग्णालयातील रिक्त असलेली वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही, सावली या तीन तालुक्याच्या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण ३ ग्रामीण रुग्णालये कार्यन्वित आहेत. तसेच सदर तीन तालुक्यांमध्ये एकुण १५ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यन्वित आहेत. सन २०१६ मध्ये सदर आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु.५४००- संवर्गाची एकूण ४२ पदे मंजूर असुन ३२ पदे भरलेली व १० पदे रिक्त आहेत. सदर १० रिक्त पदांपैकी ५ पदांवर वैद्यकीय अधिकारी, गट-ब (अस्थाई) यांची सेवा संलग्न करण्यात आलेली आहे. उक्त कार्यरत

३२ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ८ वैद्यकीय अधिकारी सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमुळे रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, भद्रावती येथील बालरोगतज्ञांची सेवा ग्रामीण रुग्णालय, सावली येथे संलग्न करण्यात आली आहे.

(२) वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु.५४००/- संवर्गाची रिक्त पदे स्थानिक स्तरावर भरण्यात यावीत म्हणून शा.नि. दि.२४.०६.२०१६ अन्वये जिल्हा स्तरावर मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली निवड समितीस अधिकार दिलेले आहेत. तसेच पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त राहणारी पदे भरती करण्यासाठी ५४५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे पीजीला जाणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागी इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून ती पदे भरण्यात येतात. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आपीएचएस खाली ग्रामीण रुग्णालय, ब्रम्हपूरी येथे १ भिषक, १ भुलतज्ञ व १ दंतशल्यचिकित्सक करार तत्वावर कार्यरत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बसमत (जि.हिंगोली) येथील स्त्री रुग्णालयात एकही स्त्रीरोग तज्ञ नसल्याबाबत

**(५) ५६३६३ (३०-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बसमत (जि.हिंगोली) येथील स्त्री रुग्णालयात एकही स्त्रीरोग तज्ञ नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी ११ डॉक्टरांचे काम केवळ ४ डॉक्टर चालवत असून स्त्रीरोग तज्ञ नसल्यामुळे महिला रुग्णांना जोखीम स्वीकारावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

स्त्री रुग्णालय बसमत, जि.हिंगोली येथे वैद्यकीय अधिकारी, गट-अ,ग्रेड पे रु.६६००/- व ग्रेड पे रु.५४००/- संवर्गातील एकुण ११ मंजुर पदांपैकी ६ पदे भरलेली आहेत. त्यात २ स्त्रीरोगतज्ञ आहेत.

स्त्री रुग्णालय, बसमत, जि.हिंगोली येथे प्रसुती तज्ञाचे (ग्रेड पे रु.६६००/-) १ पद मंजुर असुन ते रिक्त आहे. सदर रुग्णालयास स्त्रीरोगतज्ञांची ४ पदे मंजुर आहेत. सद्यस्थितीत २ स्त्रीरोगतज्ञ स्थायी स्वरुपात उपलब्ध आहेत.

सदर रुग्णालयातील उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून महिला रुग्णांची तपासणी व उपचार केले जातात व अति जोखमीच्या रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे संदर्भित केले जाते.

(३) वैद्यकीय अधिकारी/ विशेषज्ञ (ग्रेड पे रु.६६००) या संवर्गाची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे. राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु. ५४००/- संवर्गातील विशेषज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दि. २६.०२.२०१६ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने दि. १६.०४.२०१६ रोजी ४१२ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातींच्या अनुषंगाने १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयात मुलाखती घेण्यात आल्या व शासन आदेश दि. २९.०८.२०१६ अन्वये एकुण २१३ विशेषज्ञांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशात हिंगोली जिल्हयासाठी २ बालरोगतज्ञ, २ नेत्ररोगतज्ञ, २ शरीरविकृतीतज्ञांचे आदेश समाविष्ट आहेत. शासन आदेश दि.२०.०९.२०१६ अन्वये एकुण १९४ एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तसेच राज्यातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ, संवर्गाची पदे मुलाखतीद्वारे भरण्याचा शासनाने निर्णय घेतला असुन सदर प्रक्रिया राबविण्यासाठी शासन परिपत्रक दि. २४.०६.२०१६ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असुन त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरीता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय दि.२१.०४.२०१५ नुसार सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विभागीय स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील आरोग्य विभागांतर्गच्या सर्व रुग्णालयांमध्ये**

**वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे असल्याबाबत**

**(६) ६३००५ (३०-०८-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील आरोग्य विभागांतर्गत असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची एकूण ५५७ पदे अस्तित्वात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व संवर्गाच्या पदापैकी १४२ पदे अद्यापही रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पदे केव्हापासून रिक्त आहेत व त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

परभणी जिल्हयातील आरोग्य संस्थांमध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण १३८४ पदे मंजुर असून त्यापैकी ४३६ पदे रिक्त आहेत.

(३) सदर पदे वेळोवेळी सेवानिवृत्ती, स्वेच्छासेवानिवृत्ती, राजीनामा, अनधिकृत गैरहजेरी व इतर करणांमुळे रिक्त झालेली आहेत.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) संवर्गाची पदोन्नतीची व नामनिर्देशनाची रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाच्या रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची ८७७ रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात दि.२७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे व सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता जिल्हा स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## सोलापूर येथे जिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत

**(७) ६५५१८ (२७-०१-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयासाठी २०० खाटांचे सर्व सोई-सुविधांनी युक्त असे नवीन सिव्हिल हॉस्पिटल उभा करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये कोणकोणत्या सुविधा असणार आहेत,

(३) असल्यास, नव्या हॉस्पिटलच्या बांधकामास प्रत्यक्षात केव्हा सुरवात होणार आहे व त्यासाठी किती खर्च येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०८-२०१९) :** (१) हे अशंत: खरे आहे

सोलापूर येथे १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय आणि १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय स्थापन करण्यास शासन निर्णय दि.१७ जानेवारी, २०१३ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२) जिल्हा रुग्णालय आणि महिला व नवजात रुग्णालय यामध्ये १०० खाटाच्या मानकानुसार सर्व सोयी सुविधा पुरविण्यात येणार आहे.

(३) सोलापूर येथे स्थापन करण्यात आलेले १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय आणि १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय या इमारत बांधकामाच्या रु.२०३३.९० लक्ष एवढया रकमेच्या अंदाजपत्रक व आराखडयास शासन निर्णय दि.५ नोव्हेंबर, २०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी रु.२.०० कोटी असा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रीया पूर्ण करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सरु आहे.

---

**रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(८) ६५५९० (१०-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या ६७ प्राथमिक केंद्र आणि ३७८ उपकेंद्रांसाठी १४१ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून गेल्या १० वर्षांत हि पदे न भरल्यामुळे आरोग्य यंत्रणेवर ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील उपजिल्हा रूग्णालये, ७ ग्रामीण रूग्णालये व ३८ प्राथमिक रूग्णालयात १०० हून अधिक वैद्यकीय अधिकारी वर्ग १, वैद्यकीय अधिकारी वर्ग २, वैद्यकीय अधिकारी वर्ग ३ हि पदे रिक्त असून एक्सरे मशिन, डायलेसिस मशिन, व्हेंटिलेटर आदी विविध स्वरूपाची उपकरणे नादुरूस्त अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, कोकण विभागात येण्यास वैद्यकीय अधिकारी उत्सुक नसल्याने व तब्बल बारा डॉक्टर्स विनापरवानगी गैरहजर असल्याने आरोग्य यंत्रणेत मोठी पोकळी निर्माण झाल्याचे समजते, हे खरे आहे काय

(४) असल्यास, कंत्राटी तत्वावर आरोग्य केंद्रामध्ये बीएएमएस वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद आरोग्य विभागाने निधीसाठी पाठवला असतानाही त्याकडे जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाकडे एकूण ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. सदर आरोग्य संस्थांसाठी एकुण १३१ वैद्यकीय अधिकारी पदे मंजूर असून त्यापैकी ८२ पदे भरलेली आहेत व ४९ पदे रिक्त आहेत. सध्या कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांची संख्या ६२ असून रुग्णांना अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत त्यापैकी एका वैद्यकीय अधिकाऱ्याला तात्पुरत्या स्वरुपात कामगिरी देण्यात आलेल्या आहे. तसेच जिल्हा परिषद सेस निधीतून ३० कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (बीएएमएस) यांची नियुक्ती करण्यात येवून त्यांचे मार्फतही वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य संस्थांना वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १९८ पदे मंजुर असुन १२१ पदे भरलेली व ७७ पदे रिक्त आहेत. जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग, उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी, कणकवली, शिरोडा ग्रामीण रुग्णालय कुडाळ, वेंगुर्ला, दोडामार्ग, देवगड,

मालवण, पेंडूरकट्टा याठिकाणी क्ष-किरण यंत्र कार्यरत आहे व त्याकरिता क्ष-किरण तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग येथे अतिदक्षता विभाग कार्यरत आहे. या विभागामध्ये व्हेंटीलेटर यंत्र कार्यरत आहे. त्याव्यतिरिक्त उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी व कणकवली याठिकाणी व्हेंटीलेटर यंत्र कार्यरत आहे. जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग येथे ५ डायलेसिस यंत्र व २ आरओ प्लाट कार्यरत आहेत. उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी येथे २ डायलेसिस यंत्र व १ आरओ प्लांट कार्यरत आहेत. या विभागांकरिता फिजिशियन, डायलेसिस तंत्रज्ञ, अधिपरिचारीका ही पदे कंत्राटी पध्दतीने मंजूर असून भरलेली आहेत. तेथे नियमितपणे किडनीच्या आजाराच्या रुग्णांना हिमोडायलेसिस उपचार देण्यात येतात. वरील व्यतिरिक्त जिल्हा, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांमध्ये आकृतीबंधानुसार मंजूर केलेली यंत्रसामुग्री, उपकरणे, साधनसामुग्री कार्यरत आहेत. तपासणी/चाचणी सेवा रुग्णालयात उपलब्ध नसेल तर रुग्ण कल्याण समिती निधीतून सदर चाचण्या मोफत करुन दिल्या जातात.

(३) हे अंशत: हे खरे आहे.

कोकण विभागासाठी वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु.५४००/- संवर्गाची एकुण १११७ पदे मंजुर असुन ८४९ पदे भरलेली व २६८ पदे रिक्त आहेत. सदर भरलेल्या पदांपैकी एकुण ६५ वैद्यकीय अधिकारी अनधिकृत गैरहजर आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गाची एकुण २५५ पदे मंजूर असून १११ पदे भरलेली व १४४ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची पदोन्नतीची व नामनिर्देशनाची रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता ८७७ पदांची जाहिरात दि.२७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ नुसार सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता विभागीय स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील आरोग्य केंद्रामध्ये ४७ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करुन त्यांचे मानधन जिल्हा परिषद सेस अनुदानामधून अदा करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथील इर्विन रुग्णालयात पोलीस सुरक्षा पुरविण्याबाबत

**(९) ६८०५४ (२७-०१-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील इर्विन रुग्णालयात कार्यरत असताना वारंवार रुग्णांच्या नातेवाईकांकडून डॉक्टरांवर हल्ले किंवा हल्ल्याचा प्रयत्न केला जात असल्यामुळे रुग्णालयासाठी पोलिस सुरक्षा पुरवावी अशी मागणी येथील डॉक्टरांनी पोलीस आयुक्तांकडे केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीवर निर्णय घेऊन सदर रुग्णालयात पोलिसांची सुरक्षा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात ये आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे पोलीस चौकी असून तेथे दिवसरात्र पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील लाईन बझार बावडामधील रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१०) ७६६३८ (१८-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरासह ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, या हेतूने शासनाने कोल्हापूरातील लाईन बझार बावडामध्ये असणाऱ्या सेवा रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन सुसज्ज इमारत उभारली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये अनेक पदे अदयापी रिक्त असून कांही डॉक्टर प्रतिनियुक्तीवर, तर अस्थिरोगतज्ञ गेली दोन वर्ष नियुक्ती असूनही दवाखान्यात उपस्थित झालेले नाही, तसेच रुग्णालयाला पूर्णवेळ वैद्यकिय अधिक्षक नसल्याने रुग्णालयाची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रुग्णालयाच्या कामकाजाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार उक्त रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

दि.०७.०७.२०१७ रोजी तत्कालीन वैद्यकीय अधिक्षकाची बदली झालेमुळे दि. ०९.०१.२०१७ पासून सदरहू रुग्णालयातील सेवाजेष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचेकडे वैद्यकीय अधिक्षकांचा कार्यभार सुपूर्द करण्यात आलेला असून रुग्णालयातील कामकाज सुरळीतपणे सुरु आहे.

तसेच रुग्णालयात ७ वैद्यकीय अधिकारी व २ आयुष वैद्यकीय अधिकारी तसेच आय.पी.एच.एस. अंतर्गत १ सर्जन, स्त्रीरोगतज्ञ व भूलतज्ञ पॅनेल कॉल बेसीसवर कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) संवर्गाची पदोन्नतीची व नामनिर्देशनाची रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाच्या रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची ८७७ रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात दि.२७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे व सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता जिल्हा स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यातील रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) ८३७७८ (२०-०४-२०१७). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज, अंबेजोगाई व बीड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, ट्रामा केअर युनिट अशा अनेक ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांची व इतर पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्याने, ग्रामीण भागातील रुग्णास अनेक वैद्यकीय उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वेळोवेळी मागणी करूनही अजूनपर्यंत ही पदे भरण्यात न आल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरील पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केज, अंबेजोगाई व बीड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, ट्रामा केअर युनिट अशा संस्थेत वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण ११४ पदे मंजुर असुन त्यापैकी ८६ पदे भरलेली आहेत व २८ पदे रिक्त आहेत.
तसचे गट ब, गट-क व गट-ड संवर्गाची एकुण १०५९ पदे मंजुर असुन त्यापैकी ७५६ पदे भरलेली आहेत व ३०३ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) २७ डिसेंबर, २०१८ रोजी ८७७ पदे नामनिर्देशनाने भरण्याबाबतची जाहिरात शासनस्तरावरुन देण्यात आली आहे. त्या पदभरतीची प्रक्रिया कार्यन्वीत आहे. रिक्त पदांवार कंत्राटी तसेच बंधपत्रीत उमेदवार नियुक्त करुन त्यामार्फत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड तालुक्यातील नेकनूर येथील स्त्री व कुटीर या दोन्ही रुग्णालयासाठी केवळ चार डॉक्टर कार्यरत असल्याबाबत**

**(१२) ९०४५४ (१२-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यातील नेकनूर येथील स्त्री व कुटीर दोन्ही रुग्णालयासाठी १२ ते १५ डॉक्टरांची आवश्यकता असताना केवळ चारच डॉक्टर कार्यरत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात नेकनूरसह आसपासच्या जवळपास ६० ते ७० खेडयापाडयातून रुग्ण येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय बीड अंतर्गत नेकनुर ता.जि.बीड या ठिकाणी ६० खाटांचे एक स्त्री रुग्णालय व ३० खाटांचे एक कुटीर रुग्णालय कार्यन्वित आहेत.

स्त्री रुग्णालय, नेकनुर येथे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) संवर्गाची ४ पदे मंजुर असुन ४ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची ७ पदे मंजुर असुन ६ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे.

कुटीर रुग्णालय नेकनुर येथे वैद्यकीय अधिक्षक १ पद मंजुर असुन ते भरलेले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाची ३ पदे मंजुर असुन ३ पदे भरलेली आहेत.

तथापि, स्त्री रुग्णालय नेकनुर येथे स्त्रीरोगतज्ञ व भुलतज्ञ या विशेषज्ञाच्या सेवा कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कुटीर रुग्णालय नेकनुर येथे आयुर्वेदीक, होमीओपॅथी व युनानी या तीन पॅथीचे प्रत्येकी एक वैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.६६००/) संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय रुग्णालयातील हजर राहत नसणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची तक्रार करण्याबाबत

**(१३) १०३८२९ (०६-०१-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रासह ग्रामीण, उपजिल्हा, जिल्हा रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी ड्युटीवर असताना जागेवर नसल्यास किंवा बाहेर फिरत असल्याचे आढळून आले तर त्यांची १०४ या टोल क्रमांकावर तक्रार नोंदवून घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची अंमलबजावणी सुरु झाली आहे काय,

(३) नसल्यास, या निर्णयाची कधीपासून अंमलबजावणी सुरु होण्याची अपेक्षा आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

१०४ या टोल क्रमांकावर तक्रार नोंदवून घेण्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयात वैद्यकीय अधिका-यांसह इतर पदे रिक्त असल्यामुळे रूग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१४) १०८२४७ (०५-०४-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील माढा मतदारसंघासह सर्वच तालुक्यातील ग्रामीण रूग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्र यामधील वैद्यकीय अधिका-यांसह आवश्यक कर्मचा-यांची पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील गरीब, गरजू रूग्णांना वेळेत वैद्यकीय उपचार मिळणेसाठी ग्रामीण रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे निर्माण केली आहेत परंतु माढा, कुर्डूवाडी, करकंब या ग्रामीण रूग्णालयासह मानेगांव, रोपळे(क.), उपळाई (बु.), मोडनिंब, टेंभुर्णी, आलेगांव (खु.), पिंपळनेर, उंबरे (पा.), या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माता, परिचारिका स्त्री-पुरुष तंत्रज्ञ आदि पदे गेल्या अनेक दिवसापासून रिक्त असल्याने गरजू रूग्णांना वैद्यकीय सेवा वेळेत मिळत नाही यासाठी सदर पदे भरणेबाबत स्थानिक नागरिकांतून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न क्र.१ व २बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, नमुद ठिकाणची रिक्त पदे भरणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सोलापुर जिल्ह्यात ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १४ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित असून तेथील रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | संवर्ग | ग्रामीण रुग्णालये | | | प्राथमिक आरोग्य केंद्रे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर | भरलेली | रिक्त | मंजुर | भरलेली | रिक्त |
| १ | वैद्यकीय अधिक्षक | १४ | ० | १४ | ० | ० | ० |
| २ | वैद्यकीय अधिकारी | ४२ | २८ | १४ | १५९ | १११ | ४८ |
| ३ | दंत चिकित्सक | ११ | ५ | ६ | ० | ० | ० |
| ४ | गट-क | १३६ | ५५ | ८१ | ११९० | ७५५ | ४३५ |
| ५ | गट-ड | १०५ | ५५ | ५० | - | - | - |
| एकूण | | ३०८ | १४३ | १६५ | १३४९ | ८६६ | ४८३ |

सोलापूर जिल्ह्यातील कार्यरत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत रुग्णांना सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट अ ग्रेड पे रु.६६००/ संवर्गाची पदोन्नती व सरळसेवेची पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरिता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ नुसार वैद्यकीय अधिकारी संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता जिल्हा स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील बालरोग तज्ञांचे पद रिक्त असल्याबाबत

**(१५) ११२२८४ (०१-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील बालरोग तज्ञ हे पद रिक्त असल्यामुळे बालके कुपोषित होणे, कमी वजनाची बालके जन्माला येणे, पूर्ण वाढ न झालेली बालके जन्माला येणे इत्यादी वेगवेगळ्या कारणांनी तालुक्यात बालमृत्यूचे प्रमाण वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बालरोग तज्ञ पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य संस्थांसाठी निश्चित केलेल्या विशेषज्ञांच्या प्रमाणकानुसार ग्रामीण रुग्णालय, मोखाडा येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गाची ३ पदे मंजूर आहे. त्यामध्ये बालरोगतज्ञांचे १ पद मंजुर असुन ते माहे जानेवारी २०१८ मध्ये शासन स्तरावरुन भरण्यात आलेले आहे.

ग्रामीण रुग्णालय, मोखाडा येथे माहे एप्रिल ते डिसेंबर २०१७ दरम्यान एकुण ३०१ प्रसुती झालेल्या असुन त्यापैकी कमी वजनाचे एकुण १४ बालके जन्माला आली आहेत. परंतु सदर संस्थेमध्ये एकही बालमृत्यू झालेला नाही.

मोखाडा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राची सन २०१७-१८ ची बालमृत्यूची आकडेवारी ५६ आहे व सन २०१८-१९ (माहे डिसेंबर २०१८ अखेर) ची बालमृत्यूची आकडेवारी २६ आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हा रुग्णालयात बालरोगतज्ञ, निवासी वैद्यकीय अधिकारी इत्यादी पदे रिक्त असल्याबाबत

**(१६) ११२५६८ (०१-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हा रुग्णालयात बालरोगतज्ञ, निवासी वैद्यकीय अधिकारी इत्यादी पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या काही वर्षापासून रुग्णांची संख्या अनेक पटीने वाढली असल्यामुळे उपलब्ध असलेली यंत्रणा वाढत्या रुग्ण संख्येला अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गात ५३ पदे मंजूर असून त्यापैकी ४० पदे भरण्यात आलेली आहेत. त्यामध्ये ३ बालरोगतज्ञांचा समावेश आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड वेतन रु. ५४००) मध्ये ३५ पदे मंजूर असून ती सर्व पदे भरलेली आहेत. तसेच स्त्रीरोगतज्ञ-४, क्ष-किरणतज्ञ-२, किडणीविकारतज्ञ, मनोविकारतज्ञ, दत्तशल्यचिकित्सक, बालरोगतज्ञ (एसएनसीयु) प्रत्येकी एक अशी एकूण ११ पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली असून, त्यांच्या सेवा ऑन कॉल तत्वावर घेण्यात आलेल्या आहेत. त्यांच्यामार्फत रुग्ण सेवा पुरविण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु.६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या तक्रारीबाबत**

**(१७) ११३७४८ (१२-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या विरुध्द तक्रार देऊ नये यासाठी जिल्ह्याबाहेरील एका मंत्र्याचा दबाव होता, असा दावा येथील वर्ग-२ जमीन विक्री परवानगी प्रकरणात निलंबीत उपजिल्हाधिकारी यांनी केला असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्तांनी रुपये १ कोटीची मागणी केली असल्याची तक्रार या उपजिल्हाधिकारी यांनी सिटी चौक पोलीस ठाण्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१९) :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) तत्का. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तत्का. निलंबित उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी पोलीस निरीक्षक, सिटी चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद शहर यांच्याकडे दि.०८.०१.२०१८ रोजी केली होती. तथापि, प्रस्तूत प्रकरणात तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याविरुद्ध अर्जात नमूद गुन्हा दाखल करणे उचित होणार नाही असा अहवाल पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांनी शासनास सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक आरोग्य विभागातील ५०० पेक्षा जास्त वैद्‌यकीय**
**अधिकारी सेवानिवृत्त होत असल्याबाबत**

**(१८) १२०८४८ (०६-०८-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ मध्ये वैद्‌यकीय अधिकारी व वरिष्ठ वैद्‌यकीय अधिकाऱ्यांचे निवृत्ती वय ५८ वरून ६० वर्षे करण्याचा अध्यादेश सार्वजनिक आरोग्य विभागाने काढला असून या अध्यादेशाची मुदत ३१ मे, २०१८ पर्यंत असल्यामूळे ३१ मे, २०१८ रोजी राज्यातील एकाच वेळी ५०० च्यावर वैद्‌याकीय अधिकारी व वरिष्ठ अधिकारी सेवा निवृत्त होणार असल्याची बाब दिनांक २५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील राज्य कामगार योजनांच्या रुग्णालयातील १९ तज्ञ वैद्‌यकीय अधिकारी तसेच ठाणे जिल्हयातील १५ हून अधिक वरिष्ठ वैद्‌यकीय अधिकारी एकाच वेळी सेवानिवृत होत असल्याने रुग्णसेवेवर त्याचा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या आरोग्य विभागात वरिष्ठ डॉक्टरांसह तब्बल १६,१८१ पदे रिक्त असून सध्या आरोग्य विभागाचा कारभार हंगामी तत्वावर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत तसेच सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य सेवा संचालनालयातील संचालक, आरोग्य सेवा, उपसंचालक, आरोग्य सेवा, सहायक संचालक, आरोग्य सेवा तसेच महाराष्ट्र वैद्‌यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ व वैद्‌यकीय अधिकारी (ग्रेड पे रु.५४०० व त्यावरील) जे अधिकारी नियत वयोमानानुसार दि.३१.०५.२०१८ रोजी सेवानिवृत्त होत आहेत अशा अधिकाऱ्यांनी दि. ३१.०५.२०१८ रोजी जरी ५८ वर्षे पूर्ण केली असली तरी ज्यांचे वय दि. ३१.०५.२०१८ रोजी ६० वर्षापेक्षा कमी आहे अशा अधिकाऱ्यांना सेवानिवृत्त न करता त्यांच्या बाबतीत मंत्रीमंडळासमोर वय वाढविण्याबाबतचा

प्रस्ताव सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून किंवा पुढील आदेश होईपर्यंत किंवा वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत शासन सेवेत ठेवण्यात आले होते तसेच याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळापुढे ठेवण्यात आला होता. त्यास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून, त्याबाबतचा शासन निर्णय दि. २९.०८.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) हे ही अंशतः खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील एकूण ५९ वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन आदेश दि. ०९.०५.२०१८ च्या आदेशान्वये वैद्यकीय अधिक्षक म्हणून नियुक्ती दिलेली आहे. उर्वरीत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द होवून पदे भरण्यासाठी पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच शासनाने शासन निर्णय दि. २९ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशान्वये पाच वर्षासाठी वैद्यकीय अधिकारी गट-अ व त्यावरील वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्याचे वय ५८ वरुन ६० वर्ष वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत

**(१९) १२४८२३ (०६-०८-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात डॉक्टर उपलब्ध होत नसतील तर बाहेरील राज्यातून डॉक्टरांना राज्यात बोलवून त्यांना चांगला मोबदला व आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा देण्यात याव्यात असे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी व दुर्गम भागातील डॉक्टरांची नियुक्तीनंतर तीन वर्षात बदली होत नसल्याने त्यांना बदली करुन घेण्यासाठी वारंवार मंत्रालयात जावे लागत असल्यामुळे या भागत डॉक्टर येण्यास तयार नसतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने विशेष धोरण आखून या आदिवासी व दुर्गम भागातील जनतेला चांगल्या वैद्यकीय सोई-सुविधा व तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती कमीतकमी कालावधीत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) आदिवासी व दुर्गम भागात वैद्यकीय अधिकारी यांना सेवा बजावण्यात प्रोत्साहीत करणेसाठी अतिदुर्गम व दुर्गम भागातील जनतेला आरोग्य सेवा नियमित पुरविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा रुग्णालये यावरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना वेतनाव्यतिरिक्त त्यांच्या कामानुसार जास्तीचा आर्थिक लाभ देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील माहूर व लोहा येथील नागरीकांना आरोग्यसंदर्भात उद्‌भवणा-या समस्या**

**(२०) १२७०८७ (११-१२-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहूर (जि.नांदेड) आदिवासी बहुल नक्षल प्रवण तालुक्यातील आरोग्य विभागात मागील काही वर्षापासून डॉक्टर व कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असून त्यांना देण्यात येणारी निवासस्थानेही मोडकळीस आल्याने नागरीकांच्या आरोग्याची समस्या निर्माण झाली असल्याचे दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत तेथे आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या एकूण १४३ पदा पैंकी २६ पदे रिक्त असून, रुग्णवाहिकेची देखिल दुरवस्था झाली असल्याने रुग्णांना रुग्णालयात ने-आण करण्यासासाठी खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, लोहा (जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केद्रांची दुरवस्था झाली असून सदर केंद्र आणि उपकेंद्रामधील अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुख्यालयी रहाण्याचे आदेश असतानाही ते मुख्यालयी राहत नसल्याने रुग्णांना तालुका, जिल्हयामधील रुग्णालयात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार नांदेड जिल्हयातील माहूर व लोहा येथील आरोग्यासंदर्भातील समस्या दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्हयातील माहूर तालुक्यात ३० खाटांचे १ ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत.

ग्रामीण रुग्णालयात, गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण ३० पदे मंजुर असुन २४ पदे भरलेली व ६ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांवर पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली असून कार्यालयीन कामकाज व रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

ग्रामीण रुग्णालय, माहूर येथे कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता २३ निवासस्थाने बांधण्यात आलेली असून त्यापैकी ८ निवासस्थाने नादुरुस्त आहेत व १५ निवासस्थानात रुग्णालयीन कर्मचारी राहत आहेत.

माहुर तालुक्यात जिल्हा परिषद आरोग्य विभागात एकुण १०४ पदे मंजुर असुन ८९ पदे भरलेली व १५ पदे रिक्त आहेत. तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारत बांधकाम व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थाने बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, माहूर येथे १०२ या रुग्णवाहिकेद्वारे गरोदर माता व बालकांना तसेच १०८ रुग्णवाहिकेद्वारे रुग्णांना संदर्भित करण्यात येते.

ग्रामीण रुग्णालय माहूर करिता २ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून त्यापैकी एक रुग्णवाहिकेचा अपघात झाला असून सदर रुग्णवाहिका दुरुस्तीसाठीची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत ग्रामीण रुग्णालय, माहूर येथे एक रुग्णवाहिका कार्यरत असून आवश्यकतेनुसार नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकेद्वारे रुग्ण संदर्भित करण्यात येतात.

नांदेड जिल्ह्यातील माहुर व लोहा तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या रुग्णवाहीका ह्या सुस्थितीत आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांना इमारती आहेत. त्यापैकी मौजे सोनखेड व कलंबर येथील इमारती मोडकळीस आल्याने पाडुन नवीन बांधकाम प्रस्तावित करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी वास्तव्य करुन राहतात तसेच अधिकारी व कर्मचारी यांना मुख्यालयी राहण्याबाबत सक्त सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आटपाडी तलावातील (जि.सांगली) वाळू लिलावाच्या संविदा देण्याबाबत

**(२१) १२७५०२ (१०-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील आटपाडी तलावातील वाळू लिलावाची संविदा देण्यास तयार असल्याचा ठराव आटपाडी ग्रामपंचायतीने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठरावानुसार आटपाडी तलावातील वाळूचा लिलाव करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०८-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची वाळू लिलावास शिफारस नसल्याने तसेच पर्यावरण मंजूरी प्राप्त झाली नसल्याने वाळू लिलाव करण्यात आला नाही.

---

**पळशी (जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी नेमण्याबाबत**

**(२२) १२९३६५ (११-१२-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पळशी (जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांची उपचाराअभावी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्राथमिक आरोग्य केंद्रात कायमस्वरुपी पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी देण्याबाबत स्थानिक नागरिक शासनाकडे वारंवार मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार पळशी प्राथमिक आरोग्य केंद्रात पूर्णवेळ वैदयकिय अधिकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
प्राथमिक आरोग्य केंद्र पळशी (जि.सातारा) येथे वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाची दोन पदे मंजुर आहेत. त्यापैकी एक पद भरलेले व एक पद रिक्त आहे. सदर भरलेल्या पदावर पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरिता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. नियमित भरती होईपर्यंत शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ नुसार सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने विभागीय स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कोतवाल, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका व पोलीस पाटील यांच्या मागण्यांबाबत**

**(२३) १२९९१७ (०५-१२-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोतवाल, पोलीस पाटील, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका यांच्या मागण्याच्या अनुषंगाने त्यांना सामाजिक सुरक्षा व दर्जा देण्यासाठी व त्यांचे कौटुंबिक उपजीविका योग्य रितीने व्हावी असे वेतन देण्यासाठी राज्य शासनाने अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्याबाबतचा निर्णय महसूल व वन विभागामार्फत दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार स्थापन केलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१९) :** (१), (२), (३) व (४) कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा द्यावयाचा झाल्यास राज्यातील कोतवालांप्रमाणे इतरही मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांचीही मागणी पुढे येण्याची शक्यता विचारात घेता, अशा मानधनावर कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी, त्यांच्यासाठी "एकछत्र योजना" तयार करण्याकामी अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी महसूल व वन विभाग, दिनांक १८ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. सदर समितीने आपल्या शिफारशींसह सादर केलेला अहवाल तसेच कोतवालांच्या एकत्रित कामांचे स्वरुप, त्यांची पूर्णवेळ शासकीय कामाशी बांधीलकी विचारात घेता कोतवालांना देण्यात येणाऱ्या मानधनात सेवाजेष्ठतेनुसार मानधन वाढ करणे, त्यांना "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात योजना", "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या योजनांचा लाभ देणे व त्यांचा चतुर्थ श्रेणीच्या सरळसेवेच्या पदांमध्ये शिपाई म्हणून प्रथम नियुक्तीचा कोटा २५ % वरुन ४० % पर्यंत वाढविणे या संबंधी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला व त्यानुसार दि.०६.०२.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

---

### लातूर जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) १३०७५४ (१०-१२-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रामधील तसेच ग्रामीण रुग्णालयातील शासन मान्य मंजूर असलेली वैद्यकीय अधिकारी गट अ व ब, आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक यांची पदे रिक्त असून आरोग्य विभागातील अनेक कर्मचारी प्रतिनियुक्तीवर इतर विभागात कार्यरत असल्यामुळे आरोग्य सेवेवर त्याचा परिणाम होत असून रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार ग्रामीण भागातील रुग्णांना तत्परतेने आरोग्य सेवा देण्यासाठी सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

लातुर जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक अंतर्गत एकुण १० ग्रामीण रुग्णालये कार्यन्वित आहेत. सदर ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण ४८ पदे मंजुर असुन ४६ भरलेली व २ पदे रिक्त आहेत. तसेच सदर ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी औषध निर्माण अधिकारी संवर्गाची एकुण १६ पदे मंजुर असुन सर्व पदे भरलेली आहेत. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक लातुर कार्यालयाच्या अधिनस्त संस्थेतील एकही कर्मचारी इतर विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत नाहीत.

लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत एकुण ४६ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण १०१ पदे मंजुर असुन ७८ पदे भरलेली व २३ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गाची एकुण ९ पदे मंजुर असुन ७ पदे भरलेली व २ पदे रिक्त आहेत. तसेच आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सहायक, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सहायक, आरोग्य सेवक या गट क संवर्गाची एकुण ८७० पदे मंजुर असुन त्यापैकी ५७७ पदे भरलेली व २९३ पदे रिक्त आहेत.

राष्ट्रीय आरोग्य अभियानद्वारे कंत्राटी तत्वावर तज्ञसेवा उपलब्ध करुन देण्यात येतात तसेच उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येते. त्यामुळे रुग्णांची गैरसोय झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरिता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. शासन निर्णय दि.२१.०४.२०१५ नुसार सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विभागीय स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद लातुर यांच्या आस्थापनेवरील आरोग्य कर्मचारी गट-क संवर्गाची सरळ सेवेची पदे भरण्याबाबत ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग यांचेकडे कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील मेळघाटात डॉक्टरांच्या रिक्त जागा असल्याबाबत**

**(२५) १३११४३ (११-१२-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील कुपोषणग्रस्त असलेल्या मेळघाटात आरोग्य उपसंचालक, अकोला यांनी डॉक्टरांच्या बदली प्रकीयेत अनियमितता केल्याने मेळघाट येथील ७ डॉक्टरांच्या जागा अजुनही रिक्त असल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ७ जागा भरण्याबाबत मा.न्यायालयाने आदेश दिले असूनही सदर जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मेळघाट येथे डॉक्टरांच्या बदली प्रकीयेत अनियमितता केल्यासंदर्भात आरोग्य उपसंचालक, अकोला व मेळघाट येथे कामावर रूजु न होणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्यासह सदर ठिकाणी डॉक्टरांची नियुक्ती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सद्यस्थितीत मेळघाट विभागात वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु. ५४००/-) संवर्गाची एकुण ३० पदे मंजुर असुन २९ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे.

तसेच वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गाची एकूण २७ पदे मंजूर असून त्यापैकी २७ पदे अस्थायी नियुक्तीने भरलेली आहेत.

मेळघाट येथे रुजू न झालेल्या २ वैद्यकीय अधिकारी, गट-ब यांच्या सेवा संपुष्टात आणल्या आहेत.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरीता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ नुसार सदर संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विभागीय स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहुर (जि.नांदेड) तालुक्यात ऑनलाईन ७/१२ मिळत नसल्याबाबत

**(२६) १३२५१० (३०-११-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहुर (जि.नांदेड) तालुक्यात एक महिन्यापासून शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन ७/१२ मिळत नसल्याचे दिनांक १५ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे पीककर्ज मिळविणे व पीकविमा भरण्यासाठी ७/१२ मिळविताना शेतकऱ्यांची गैरसोय होत असून यामुळे शेतकऱ्यांच्या पाल्यांना फी माफी सवलत व शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने या तालुक्यात तात्पुरत्या स्वरुपात पूर्वीप्रमाणे हस्तलिखित ७/१२, नमुना नं., फेरफार नक्कल देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०४-२०१९) :** (१), (२) व (३) राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमातर्गत माहे जून, २०१८ च्या दरम्यान माहूर तालूक्याचा गा.न.नं. ७/१२ चा डेटा स्टेट डाटा सेंटर वरून नॅशनल डाटा सेंटर वर स्थलांतरीत होत असताना तांत्रीक अडचणीमुळे सर्व्हर बंद असल्याने शेतकऱ्यांना ऑनलाईन गा.न.नं.७/१२ उपलब्ध करून देण्यामध्ये काही काळ व्यत्यय निर्माण झाला होता. परंतु डेटा ट्रान्सफर चे काम झाल्यानंतर राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, नांदेड यांनी उपलब्ध करून दिलेल्या दोन व्हीपीएन चा वापर करून माहूर तालुक्यातील सर्व गावांचा गा.न.नं. ७/१२ पीडीएफ स्वरूपामध्ये डाऊनलोड करण्यात आला व सदर गा.न.नं. ७/१२ शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आले. सदर तांत्रिक अडचणीमुळे माहूर तालुक्यातील शेतकरी हे पीक कर्ज मिळवणे, पीक विमा भरणे किंवा त्यांच्या पाल्यांना सवलतीपासून किंवा शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागल्याबाबत तक्रार प्राप्त झाली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्हयातील शासकीय रुग्णालयतील रिक्त पदांमुळे रुग्णांची होणारी गैरसोय

**(२७) १३३७०७ (११-१२-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील शासकीय रुग्णालयात डॉक्टरांसह परिचारिका, कक्षसेवक, सफाईदार, लॅब टेक्निशियन यांची रिक्त पदे असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील पदे केव्हापासून रिक्त आहेत व त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जालना जिल्हयातील जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांचे अधिनस्त १ सामान्य रुग्णालय, १ उपजिल्हा रुग्णालय, ८ ग्रामीण रुग्णालये अश्या १० आरोग्य संस्था कार्यन्वित आहेत. सदर आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) संवर्गाची एकुण २७ पदे मंजुर असुन त्यापैकी ०८ पदे भरलेली व १९ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी,गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची एकुण ८९ पदे मंजुर असुन त्यापैकी ८७ पदे भरलेली आहेत. तसेच परिचारीका, कक्षसेवक, सफाईदार, लॅब टेक्नीशियन या संवर्गाची एकुण ३२९ पदे मंजुर असुन त्यापैकी २५९ पदे भरलेली व ७० पदे रिक्त आहेत.

जालना जिल्हयात एकुण ४० प्राथमिक आरोग्य केंद्रे, २१८ उपकेंद्र, २ आयुवेर्दीक दवाखाने, ३ युनानी दवाखाने, २ प्राथमिक आरोग्य पथक, १ नागरी दवाखाना कार्यन्वित आहेत. सदर संस्थांमध्ये शासनाने ठरवुन दिलेल्या निकषानुसार सर्व आरोग्य विषयक सेवा सुविधा नियमीतपणे भरण्यात आलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत ग्रामीण जनतेस पुरविल्या जातात. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना अंतर्गत वैद्यकीय अधिकारी,गट-अ ची एकुण ९१ पदे मंजुर असुन ४५ पदे भरलेली व ४६ पदे रिक्त आहेत. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांची एकुण ८२६ पदे मंजुर असुन ५४१ पदे भरलेली व २८५ पदे रिक्त आहेत.

उक्त आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णसेवा पुरविली जाते. रुग्णांची गैरसोय न होता सुविधा पुरविल्या जातात. प्राथमिक आरोग्य केंद्रस्तर व उपकेंद्रस्तरावरुन ग्रामीण जनतेस अविरत आरोग्य सेवा पुरविण्यात येते. तसेच शासनाने वेळोवेळी केलेल्या निर्देशानुसार सर्व आरोग्य विषयक कार्यक्रम राबवुन ग्रामीण जनतेस आरोग्य विषयक सोयी सुविधा पुरविण्यात येतात. त्यामुळे ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर रुग्णांची गैरसोय होत नाही.
(२) सदर पदे वेळोवेळी सेवानिवृत्ती, स्वेच्छासेवानिवृत्ती, राजीनामा, अनधिकृत गैरहजेरी व इतर कारणामुळे रिक्त आहेत.
(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ( ग्रेड पे रु.६६००/-) संवर्गाची नामनिर्देशनाची व पदोन्नतीची रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी भरण्याकरीता ८७७ रिक्त पदांची जाहिरात दि. २७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे. शासन निर्णय दि. २१.०४.२०१५ नुसार सदर

संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पदध्दतीने भरण्याकरीता विभागीय स्तरावर समिती गठीत करुन भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. परिचारीका, कक्षसेवक, सफाईदार, लॅब टेक्नीशियन यांची रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालु आहे. स्वच्छता सेवा ह्या बाह्य यंत्रणेमार्फत उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीबाबत

**(२८) १३४७८३ (०४-०६-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ (जुना क्र.१७) च्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भागाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात (वर्षनिहाय) एकूण किती निधी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग यांना प्राप्त झाला आहे,
(२) तसेच, सदरहू प्राप्त झालेल्या निधीतून सन २००८-२००९ ते सन २०१७-२०१८ या कालावधीत वर्षनिहाय किती रक्कम प्रत्यक्षात देखभाल व दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आली आहे,
(३) तसेच, सदरहू प्राप्त झालेल्या निधीपैकी उपअभियंता, राष्ट्रीय महामार्ग सिंधुदुर्ग यांनी सदर निधी खर्च न केल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची अत्यंत दुरवस्था झाली असून त्यामुळे मोठया प्रमाणात अपघात घडून जिवीत व वित्त हानी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू निधी अखर्चित राहण्याची कारणे काय व सदर निधी अखर्चित ठेवणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०८-२०१९) :** (१) व (२) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १०४.१० कि.मी. भागाच्या देखभाल व दुरुस्तीकरीता सन २००८-०९ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये एकूण रु.७.२५ कोटी इतका निधी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांना प्राप्त झाला होता.
सदरहू वर्षनिहाय प्राप्त निधी व त्यामधून वर्षनिहाय देखभाल व दुरुस्तीसाठी करण्यात आलेला खर्च पुढिलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | प्राप्त निधी (कोटीमध्ये) | झालेला खर्च (कोटीमध्ये) | अखर्चित निधी (कोटीमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | ०.५७ | ०.५७ | ०.०० |
| २ | २००९-१० | ०.५३ | ०.५३ | ०.०० |
| ३ | २०१०-११ | १.१६ | १.१६ | ०.०० |
| ४ | २०११-१२ | १.६२ | १.६२ | ०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | २०१२-१३ | ०.३७ | ०.३७ | ०.०० |
| ६ | २०१३-१४ | ०.६६ | ०.६६ | ०.०० |
| ७ | २०१४-१५ | ०.१४ | ०.१४ | ०.०० |
| ८ | २०१५-१६ | ०.६८ | ०.६८ | ०.०० |
| ९ | २०१६-१७ | ०.८६ | ०.८६ | ०.०० |
| १० | २०१७-१८ | ०.६६ | ०.६६ | ०.०० |
| एकूण | | ७.२५ | ७.२५ | ०.०० |

(३) हे खरे नाही.

प्राप्त निधीतून राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या सिंधुदुर्ग जिल्हयातील महामार्ग वाहतुकीयोग्य ठेवण्याच्या दृष्टिने अस्तित्वातील डांबरी पृष्ठभागाच्या आवश्यक देखभाल-दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली. त्यामुळे निधी खर्च न केल्याने महामार्गाची दुरावस्था झाली व अपघात होऊन जिवित व वित्त हानी झाली, हे खरे नाही.

(४) निधी अखर्चित राहीलेला नाही. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयाच्या बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेल्या निधीबाबत

**(२९) १३४७८५ (०४-०६-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयाच्या बांधकाम विभागाकडे सन २००८-२००९ ते सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात (वर्षनिहाय) शासनाकडून रस्ते बांधणे, रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी एकूण किती निधी प्राप्त झाला आहे,

(२) तसेच, शासनाकडून प्रत्येक आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या निधीतून प्रतिवर्षी उपरोक्त कामासाठी प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करण्यात आली आहे,

(३) तसेच, उपरोक्त कामासाठी शासनाकडून प्रतिवर्षी कोट्यावधी रुपये प्राप्त झालेले असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने अनेक कामे केली नसल्यामुळे प्रतिवर्षी मोठ्याप्रमाणात निधी शासनाकडे परत पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निधी संपूर्णतः खर्च न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर निधी अखर्चित ठेवणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०७-२०१९) :** (१) व (२) सिंधुदुर्ग जिल्हयासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याच्या कामांसाठी वर्षनिहाय प्राप्त निधी व खर्च खालील प्रमाणे आहे.

| आर्थिक वर्ष | प्राप्त निधी (रुपये लक्ष) | खर्च (रुपये लक्ष) |
|---|---|---|
| सन २००८-२००९ | ४३३३.४० | ४३३३.४० |
| सन २००९-२०१० | ६८२१.२४ | ६८२१.२४ |
| सन २०१०-२०११ | ६३१४.५३ | ६३१४.५३ |
| सन २०११-२०१२ | ६९७६.२१ | ६९७६.२१ |
| सन २०१२-२०१३ | ७७७५.९४ | ७७७५.९४ |
| सन २०१३-२०१४ | ८३२१.८२ | ८३२१.८२ |
| सन २०१४-२०१५ | ८९२६.३७ | ८९२६.३७ |
| सन २०१५-२०१६ | ७४६०.१७ | ७४६०.१७ |
| सन २०१६-२०१७ | ९९४९.१२ | ९९४९.१२ |
| सन २०१७-२०१८ | ७२२६.२७ | ७२२६.२७ |
| एकूण | ७४१०५.०७ | ७४१०५.०७ |

(३) प्राप्त झालेला सर्व निधी खर्च झालेला आहे,तो परत पाठविण्यात आलेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा व्यवस्थापन मंडळांची बैठक झाली नसल्याबाबत**

**(३०) १३५३६१ (१५-०७-२०१९). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यात जिल्हा व्यवस्थापन मंडळांची मागील ८ महिन्यांत बैठकच झाली नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन बैठक घेण्याबाबत न्यायालयाने दोन्ही मंडळांना वेळोवेळी स्मरण आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ८ महिन्यांत दोन्ही मंडळांची एकही बैठक न होण्याची नेमकी काय कारणे आहेत,

(३) असल्यास, भविष्यात आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा व्यवस्थापन मंडळांच्या बैठक घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०८-२०१९) :** (१) होय.

(२), (३) व (४) मुंबई शहर व मुंबई उपनगरे या जिल्ह्यांकरिता दिनांक २० एप्रिल २०१८ पासून स्वतंत्र जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आल्यानंतर या प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मे २०१९ पर्यंत प्रत्येकी ५ बैठका घेण्यात आल्या आहेत.

---

## मुंबई व नवी मुंबईमध्ये रोप-वे प्रकल्प राबविण्याबाबत

**(३१) १३५७२० (०५-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबईतील प्रवाशांची गैरसोय होत असल्याने वाहतुकीच्या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी बोरीवली ते ठाणे, घाटकोपर ते वाशी, वाशी ते बेलापूर व नेरळ ते माथेरान असा रोप-वे प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट, आय.टी. पार्क, बिझनेस पार्क, एमआयडीसी इत्यादीमुळे नवी मुंबईत मोठ्या प्रमाणात वर्दळ राहत असल्याने वाहतुक कोंडी होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील रोप-वे प्रकल्पाप्रमाणेच नवी मुंबईत वाशी ते ऐरोली, ऐरोली ते भांडूप व घणसोली ते कांजुरमार्ग असा रोप-वे प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण करण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री महोदयांना माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सर्वेक्षण करुन उपरोक्त ठिकाणी रोप-वे प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

नमूद प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हवाई रज्जूमार्ग सल्लागार समितीस प्राप्त झालेले नाहीत.

(३) नमूद प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हवाई रज्जूमार्ग सल्लागार समितीस प्राप्त झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील वेदगंगा नदीवर उभारण्यात येत असलेल्या गारगोटी-म्हसवे पुलाच्या कामाबाबत

**(३२) १३६३६६ (०१-०७-२०१९). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील वेदगंगा नदीवर कोटयवधी रुपये खर्च करुन उभारण्यात येत असलेल्या गारगोटी-म्हसवे पुलाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, या पुलाच्या कामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदर पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१९) :** (१) मुख्य पुलाचे बांधकाम पुर्ण झाले असुन पोहच मार्गा करीता आवश्यक असणाऱ्या जमीनीची भुसंपादन प्रक्रिया अंतिम टप्यात आहे.
(२) माहे जून, २०१९ अखेर एकूण खर्च रु. ६४८.० ९लक्ष इतका झालेला आहे.
(३) भुसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. पोहच मार्गाचे काम हाती घेणेत आलेले असुन लवकरात लवकर पूर्ण् करुन रस्ता वहातुकीस सुरु करणेत येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आयुष्यमान भारत योजनेतील महत्वाच्या उपचार पध्दतीचा समावेश जन आरोग्य योजनेत करण्याचा प्रस्ताव

**(३३) १३६४०६ (१५-०७-२०१९). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाची आयुष्यमान भारत योजना राज्यात दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पासून सुरु झाली असुन सदरहू योजना शासकीय रुग्णालयांमध्ये लागू होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत खासगी रुग्णालये आणि विमा कंपनीशी केलेले करार माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान संपुष्टात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नव्याने करार करताना आयुष्यमान आणि राज्याची जन आरोग्य योजना एकत्रीकरण करुन आयुष्मान भारत योजनेतील महत्वाच्या ३०० उपचार पध्दतीचा समावेशन जन आरोग्य योजनेत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणकोणत्या उपचार पध्दतीचा समावेश जन आरोग्य योजनेत करण्यात येणार आहे व यासंदर्भात कोणती निर्णय घेतला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) होय.

केंद्र शासनाची आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासुन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसह एकत्रितरित्या सुरु झाली असुन सुरुवातीला ८३ शासकीय रुग्णालयात सदर योजना चालू होती. शासन निर्णय दिनांक ०५ मार्च, २०१९ नुसार सदरील योजना खाजगी व शासकीय अंगीकृत रुग्णालयामध्ये राबविण्यात येत आहे.

(२) होय, सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू होईपर्यंत दिनांक ०१.०१.२०१९ ते दिनांक ३०.०६.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, सदरहू मुदतवाढ संपुष्टात आल्याने दिनांक ०३.०७.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू होईपर्यंत किंवा सहा महिने (दिनांक ०१.०७.२०१९ ते दिनांक ३१.१२.२०१९) यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २६.०२.२०१९ नुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी कुटुंबास (जे प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी नसतील) ९९६ वैद्यकीय उपचारांचा व १२१ पाठपुरावा सेवांचा लाभ मिळेल व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थी कुटूंबास वरीलप्रमाणे ९९६ वैद्यकीय उपचार व अतिरिक्त २१३ वैद्यकीय उपचार अशा एकूण १२०९ वैद्यकीय उपचारांचा तसेच १८३ पाठपुरावा सेवांचा (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील १२१ पाठपुरावा सेवा व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील ६२ पाठपुरावा सेवा) लाभ मिळेल. याबाबत निविदा प्रक्रियेची कार्यवाही चालू आहे.

सध्या चालु असलेल्या एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांस ९७१ उपचारांचा व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांस १३०० उपचार पध्दतींचा लाभ मिळत आहे.

(४) शासन निर्णय दिनांक २६.०२.२०१९ मध्ये नवीन उपचारांचा समावेश असून त्यात सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व मानसिक उपचार पध्दतींचा समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेलू (ता.वणी, जि.यवतमाळ) येथे गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर केलेल्या कारवाईबाबत

**(३४) १३७४७२ (०५-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (ता.वणी, जि.यवतमाळ) येथे संबंधित नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी माहे एप्रिल, २०१९ च्या तिस-या आठवड्यात वा त्यादरम्यान रेतीचे दोन ट्रॅक्टर ताब्यात घेतले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रॅक्टरवर संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही करवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून या प्रकरणी दोषी असणा-या संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१९) :** (१), (२) व (३) दि.२३/४/२०१९ रोजी मौजे शेलू खुर्द, ता.वणी व मौजे चारगाव रिठ, ता.मारेगाव या मारेगाव व वणी तालुक्याच्या सीमेवर नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी हे गौण खनिजाची तपासणी करतांना वर्धा नदी पात्रातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक करीत असतांना दोन ट्रॅक्टर आढळून आल्याने सदर दोन्ही ट्रॅक्टरचा पंचनामा व जप्तीनामा तयार करण्यात आला. सदर ट्रॅक्टर पोलीस पाटील, रा.गोरज यांचे ताब्यात सूपूर्दनाम्यावर देऊन दि.२३/४/२०१९ रोजी सदर ट्रॅक्टर पोलीस पाटील यांचे घराचे आवारात ठेवण्यात आलेत. तसेच सदर ट्रॅक्टर मालकांना दि.२६/४/२०१९ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आले. तथापि, सदर दोन्ही ट्रॅक्टर अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली. याप्रकरणी पोलीस ठाणे, मारेगांव येथे दि.२६/४/२०१९ रोजी गु.र.क्र.१४४/२०१९, भा.दं.वि. चे कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### समरकुंडी-फाटा (ता.वाशी, जि.उस्मानाबाद) येथील सेवा रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत

**(३५) १३७५९१ (०५-०७-२०१९). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद-सोलापूर या महामार्गावरील समरकुंडी-फाटा (ता.वाशी, जि.उस्मानाबाद) येथील सेवा रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत सोडून देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम कोणत्या एजन्सीमार्फत सुरु करण्यात आले होते व काम अर्धवट सोडून देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१९) :** (१) होय.
सदर काम हे केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारितील असून मौजे सरमकुंडी येथील डाव्या बाजूच्या (LHS) सुमारे १५० मीटर सेवा रस्त्याचे काम हे जागा उपलब्ध न झाल्यामुळे नाईलाजाने शिल्लक राहीले आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(२) येडशी ते औरंगाबाद NH २११ या रस्त्याच्या चौपदरीकरणांतर्गत सरमकुंडी येथील सेवा रस्त्याचे काम हे M/S Yedshi Aurangabad Tollway Pvt.Ltd (IRB) या एजन्सीमार्फत सुरु करण्यात आले होते. तथापि कंत्राटदारास जमीन उपलब्ध न झाल्यामुळे सुमारे १५० मीटर सेवा रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत राहीले आहे.

(३) व (४) मौजे सरमकुंडी येथे १५० मी.च्या सर्व्हिस रोडचे काम हे संपादीत क्षेत्राच्या गट क्र. १४२ मध्ये येत असून सदरील ठिकाणी या अगोदरच्या संयुक्त मोजणीप्रमाणे श्री.विठ्ठल निवृत्ती गायकवाड व इतर यांची जमीन संपादीत होत असल्याचे दर्शविल्यानुसार संबंधीतांस सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत मावेजा अदा करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात सदर काम सुरु करते वेळी श्री.अंगद विश्वनाथ गायकवाड व श्री.धनंजय रामकृष्ण पाटील यांनी काम अडवल्यामुळे या ठिकाणी पुन:श्च करण्यात आलेल्या संयुक्त मोजणीनुसार तक्रारदार यांची जमीन संपादीत होत असल्याचे व श्री.विठ्ठल निवृत्ती गायकवाड व इतर यांचे क्षेत्र कमी असल्याचे निदर्शनास आले. यास्तव प्रस्तुत प्रकरणी याआधी मावेजा अदा करण्यात आलेल्या संबंधीतांकडून वसुली करुन श्री.अंगद विश्वनाथ गायकवाड व श्री.धनंजय रामकृष्ण पाटील यांना मावेजा अदा करण्यासाठीची कार्यवाही सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, भूसंपादन, कळंब (CALA) यांचेमार्फत सुरु आहे.

सदर प्रक्रियेअंती शिल्लक सेवा रस्त्याच्या कामाकरिता जमीन उपलब्ध झाल्यानंतर काम पूर्ण करण्यात येणार आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

---

**उपसंचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांच्या नियुक्तीबाबत**

**(३६) १३८३२२ (०५-०७-२०१९). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.बाळासाहेब वानखेडे, उपसंचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे यांच्यावर एक कोटी ७० लाख रुपयांची लाच घेतल्या प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.बाळासाहेब वानखेडे, उपसंचालक, भूमी अभिलेख विभाग, यांच्या नियुक्तीस निवड समितीने दोनदा विरोध करूनही त्यांची परत पुणे येथे नियुक्ती केली असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लाच घेतल्या प्रकरणी गुन्हा दाखल असतांना आणि निवड समितीचा विरोध असतांना परत पुणे येथे संबंधितांची यांची नियुक्ती करण्याची कारणे काय आहे,

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०८-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

श्री.बाळासाहेब वानखेडे, जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख यांना शासन आदेश क्र.आस्था २०१८/ प्र.क्र.२६/ई-६, दिनांक ०३.११.२०१८ अन्वये पदोन्नतीने उप संचालक भुमी

अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे येथे पदस्थापना देण्यात आली होती. प्रश्नाधीन लाचलुचपत प्रकरण हे दिनांक २६.१२.२०१८ रोजी घडलेले असून श्री.वानखेडे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा, सन १९८८ (सुधारीत २०१८) चे कलम ७ अ, १२ व भा.दं.वि. कलम १२० (ब) अन्वये बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर, पुणे येथे गु.र.नं. ३९२/२०१८ अन्वये गुन्हा दाखल असल्यामुळे त्यांना महसूल व वन विभाग, शासन आदेश क्रमांक आस्था-२०१९/प्र.क्र.२/ई-६, दिनांक ११.०१.२०१९ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे झालेली नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३७) १३८६९४ (११-०७-२०१९). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील विविध ठिकाणी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे झालेली नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव मागील वर्षभरापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वादळी वाऱ्यामुळे इचलकरंजी परिसरात सुमारे ३.७८ कोटी रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोल्हापूर जिल्हयात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे झालेली नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-०८-२०१९) :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर आपत्तीमध्ये शेतीपिके/फळपिकांचे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयास शासन निर्णय दिनांक १८.१२.२०१८ अन्वये रु.३२,०९,३१०/- इतकी रक्कम वितरित करण्यात आली. त्यापैकी रु.३०,५४,५८०/- इतकी रक्कम बाधितांना वितरित करण्यात आली असून, उर्वरित रक्कम रु.१,५४,७३०/- शासन समर्पित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) शहरात पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता शासकीय भूखंड देण्याबाबत**

**(३८) १३९१९३ (०५-०७-२०१९). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहरात केंद्र शासनाच्या रक्षा मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या ECHS (Ex.Servicemen Contributory Health Scheme) या योजनेअंतर्गत पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता मंजुरी मिळाली असून याकरिता अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील राखीव शासकीय भूखंड मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधीनी दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ शहरामध्ये दारुगोळा बनविणारी ऑर्डनन्स फॅक्टरी तसेच नौसेनेचे नेवल मटेरीयल्स रिसर्च लेबॉट्रटरी (एम.आर.एम.एल.) असून मोठ्या प्रमाणात भारतीय लष्करी सेवेतून निवृत्त झालेले माजी सैनिक वास्तव्यास असल्याने अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील शासकीय राखीव भूखंड पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता मिळाल्यास त्याचा त्यांना फायदा होऊ शकेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून पॉलिक्लिनिक उभारण्याकरिता अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील राखीव शासकीय भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०८-२०१९) :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३०/०१/२०१९ रोजीच्या निवेदनान्वये शासनाकडे केली आहे.

सन्माननिय सदस्यांनी उक्त निवेदनान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१९ अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले असून त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील आयजीएम रुग्णालयाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३९) १३९६०१ (०५-०७-२०१९). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील आयजीएम रुग्णालय या शासनाकडे हस्तांतरित झालेल्या रुग्णालयाच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबतचा १६ कोटी रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे जाने, २०१९ मध्ये शासनाकडे मंजूरीकरिता पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावास शासनाकडून मंजूरी देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

सा.बां.विभागाने दि.२०/०३/२०१९ अन्वये निवासस्थान व हॉस्पीटल दुरुस्तीचे अंदाजपत्रक जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहे.

तथापि सा.बां. विभागाच्या २०५९ अनिवासी इमारतीची देखभाल व दुरुस्ती लेखाशिर्षांतर्गत रु.२ कोटींचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेणापूर, लातूर व औसा (जि.लातूर) तालुक्यातील रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४०) १३९७९२ (०१-०७-२०१९). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर, लातूर व औसा (जि.लातूर) तालुक्यातील रस्त्यांचे रुंदीकरणासह सुधारणा व पुलांची पुनर्बांधणी नाबार्ड टप्पा क्र.२५ अंतर्गत निधीतून मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी लातूर ग्रामीण यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार व लोकप्रतिनिधीच्या निवेदनाच्या अनुषंगाने रेणापूर, लातूर व औसा तालुक्यातील रस्ते सुधारणा व पुलांच्या बांधकामास नाबार्ड टप्पा क्र.२५ अंतर्गत निधीतून मंजूर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१९) :** (१) होय.

(२), (३) व (४) विषयांकित काम हे मंजुरी, निकष व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**गडचिरोली जिल्हयातील रस्त्यांवर असलेल्या खड्ड्यांबाबत**

**(४१) १४०७७४ (०५-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील रस्त्यांवरील खड्ड्यांना बुझविण्याकरिता दरवर्षी देखभाल दुरुस्तीची कामे केली जात असून या कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती देणारे फलक (बोर्ड) लावले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वार्षिक रस्ते देखभाल दुरुस्ती फंडामध्ये दरवर्षी कोट्यवधी रुपयांची तरतुद करूनही प्रत्येक वर्षी नविन खड्डे तयार होत असून रस्त्यावरील खड्डे बुझविण्याची कामे न करताच अधिकारी व कंत्राटदार संगनमताने देयकाची रक्कम वाटून घेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०८-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे. योजनेत्तर कामावर माहिती फलक लावण्याची बाब करारनाम्या अंतर्गत समाविष्ट नसल्याने माहिती देणारे फलक लावण्यात आलेले नाही. तथापी खड्डे बुजविण्याचे काम सुरु असतांना आवश्यक सचेतक फलक लावण्यात आले होते.

(२) नाही, कंत्राटदाराने केलेल्या कामानुसार व गुणवत्तेनुसार देयकाचे भुगतान करण्यात आलेले आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची अफरातफर झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दौंड व शिरूर (जि.पुणे) या तालुक्यांमधील भीमा नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत.

**(४२) १४०९३४ (०५-०७-२०१९). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड व शिरूर (जि.पुणे) या तालुक्यांमधील भीमा नदीवरील पुलाच्या बांधकामाचा समावेश माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नाबार्ड अंतर्गतच्या कामांमध्ये प्राधान्याने केला जाणार असल्याचे आश्वासन मा.मंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या सर्वेक्षणाचे आणि अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू असून पुलासाठी १५ कोटी रुपयांच्या सुमारास खर्च येणार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आश्वासनाची पूर्तता करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक १० डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री महोदयांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलाचा समावेश नाबार्ड अंतर्गत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१९) :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्नाधीन रस्त्याच्या कामाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**ठाणे जिल्ह्यातील डुबीने रेती काढणाऱ्यांना परवाने देण्याबाबत**

**(४३) १४०९५३ (०५-०७-२०१९). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील नदी व खाडी पात्रातुन डुबीने रेती काढण्याचा पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक भूमीपुत्रांना परवाने देण्यात येणार असल्याचे मा.महसूल मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घोषणेच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत किती भूमीपुत्रांना परवाने देण्यात आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१९) :** (१) व (२) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी त्यांच्या दि.१२/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सन २०१८-२०१९ या वर्षात ठाणे जिल्ह्यातील कामवाडी नदी ता.भिवंडी (कामवाडी नदीच्या मुखापासून खारबांव ते रेल्वेपूल) या खाडीपात्रातील वाळूगटातून १५,३२१ ब्रास वाळू हातपाटी/ मनुष्यबळाने उत्खननास मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने सदर वाळूगटातून हातपाटी/डुबीद्वारे वाळू उत्खननास परवानगी देणेबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन रेती उत्खननाचा पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्ती/संस्था यांचेकडून दि.५/२/२०१९ पासून अर्ज मागविणेत आले आहेत. तथापि, सदर जाहिरातीनुसार अद्यापपर्यंत एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातून मालेगांव हा नवीन जिल्हा बनविण्याबाबत**

**(४४) १४०९८३ (०५-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरासह ग्रामीण भागातील लोकसंख्या सुमारे ७ लाख असून येथील नागरिकांना जिल्हास्तरीय कामाकरीता नाशिक येथे जावे लागत असल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मालेगांव हा नवीन जिल्हा बनविण्याबाबत सातत्याने मागणी केली असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून मालेगांव हा नवीन जिल्हा बनविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१९) :** (१) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) व (३) जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात धोरण निश्चित झाल्यानंतर जिल्हयाचे विभाजन/ पुनर्रचनेबाबत प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रिसोड (जि.वाशिम) नगरपरिषद क्षेत्रामधुन जाणाऱ्या राज्य महामार्ग क्र. ५१ वरील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४५) १४१२९६ (०५-०७-२०१९). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रिसोड (जि.वाशिम) नगरपरिषद क्षेत्रामधुन जाणाऱ्या राज्य महामार्ग क्र. ५१ वरील वाशिम नाका ते काळुशाबाबा दर्गा या टप्प्यातील रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे रस्ता वाहतुकीस अत्यंत गैरसोयीचा होऊन अनेक अपघात घडत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या सुधारणेसाठी विशेष बाब म्हणुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली असुन त्याबाबतचा प्रस्ताव व बजेट प्लेटसुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१९) :** (१) नाही.
(२) होय.
(३) व (४) विषयांकित रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**सिंदेखेडराजा-मेहकर-मालेगांव-कारंजा-वर्धा या महामार्गाच्या दुरुस्तीबाबत**

**(४६) १४१२९८ (०५-०७-२०१९). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेखेडराजा-मेहकर-मालेगांव-कारंजा-वर्धा हा महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर दिनांक ५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास गॅझेटनुसार हा महामार्ग दर्जोन्नत होऊन राष्ट्रीय महामार्ग ७५३ सी झाला परंतू अदयापही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरीत झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाचे अद्यापि हस्तांतरण न झाल्यामुळे महामार्गावर मोठेमोठे खड्डे पडून दुरवस्था झाली असुन रस्त्याचे अस्तरीकरण निघाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या महामार्गाची तातडीने दुरुस्ती व सुधारणा करण्याबाबत लोकप्रतिनिधी, रिसोड यांनी दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून या महामार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०८-२०१९) :** (१) व (२) होय.

(३), (४) व (५) अंशत: खरे आहे,

परंतु रस्त्यावर पडलेले खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे. तसेच या रस्त्यावरील काही लांबीतील कामे शासनाव्दारे योजनेत्तर कार्यक्रमांतर्गत विशेष दुरुस्ती अंतर्गत मंजुर असून, या पैकी काही कामे प्रगतीत व काही कामे पूर्ण झालेली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सायन-पनवेल महामार्गावर बेलापूर खिंडीजवळील दरड कोसळण्याच्या स्थितीत असल्याबाबत..**

**(४७) १४१७११ (०५-०७-२०१९). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर),**

**श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गावरील प्रसिध्द बेलापूर खिंडीआधी असलेल्या उरण फाटा येथील डोंगरावरील दरड कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी घटना घडल्यास मोठी जीवीतहानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर ठिकाणी दरड कोसळु नये म्हणुन उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) सायन-पनवेल महामार्गावरील बेलापूर खिंडीआधी असलेल्या उरणफाटा येथील डोंगरावरील दरड कोसळू नये याकरीता सुरक्षिततेच्या दृष्टीने लोखंडी संरक्षण जाळी बसविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विविध सोयीसुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४८) १४१८१७ (०५-०७-२०१९). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सेवा रस्त्यावरील (सर्व्हीस रोड) अपघातप्रवण क्षेत्रात उड्डाणपूल नसणे, अनेक ठिकाणी असलेला पथदिव्यांचा अभाव, भूमाफियांनी केलेले अतीक्रमण, अपघातग्रस्तांसाठी महामार्गालगत रुग्णालयाचा असलेला अभाव इत्यादी महत्वपुर्ण बाबींकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे या महामार्गाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून या महामार्गावर अद्यावत सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०८-२०१९) :** (१) व (२) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ नविन ४८ चे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पांतर्गत सुरत ते दहिसर या भागातील प्रस्तावित तसेच प्राधिकरणाने नव्याने मंजुरी दिलेल्या उड्डाणपूलांची (सातिवली व मालजीपाडा वगळून) बांधकामे पूर्ण होऊन ते वाहतुकीस खुले आहेत. तथापि सातिवली (वरई) भुयारीमार्गाचे बांधकाम भूसंपादनासाठी प्रलंबित आहे. परंतु सदर ठिकाणची भूसंपादन प्रक्रिया लवकरच पूर्ण होऊन या ठिकाणी भुयारीमार्गाचे बांधकाम सुरु करण्यात येणार आहे. तसेच मालजीपाडा येथे उड्डाणपूलाचे बांधकाम करण्याकरीता सदस्थितीत तेथिल सेवा रस्त्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

तसेच बांधकाम पूर्ण होऊन वाहतूकीस खुल्या असलेल्या बहुतांशी उड्डाणपूलांवर पथदिवे लावण्यात आलेले आहेत व उर्वरित ठिकाणी पथदिवे लावण्याचे काम प्रगती पथावर आहे.

महामार्ग ROW मधील अतिक्रमणे स्थानिक प्रशासनाच्या सहाय्याने काढण्याकरिता प्रक्रिया सुरु आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सुरत यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील खुलताबाद-फुलंब्री व खुलताबाद-म्हैसमाळ**
**या रस्त्यांची कामे पुर्ण करण्याबाबत**

**(४९) १४२२५० (०५-०७-२०१९). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील खुलताबाद-फुलंब्री व खुलताबाद-म्हैसमाळ या रस्त्यांची कामे संथ गतीने सुरु असल्याने रस्त्यांवर उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होऊन श्वसन विकार होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन या रस्त्यांची कामे पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सदर रस्त्यांची कामे करताना नागरिकांना धुळीचा त्रास होऊ नये यासाठी टप्प्याटप्प्याने खोदकाम करुन पुरेशी दक्षता घेण्यात येत आहे. नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि खुलताबाद-फुलंब्री राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-एच कि.मी.१३७/७५८ ते १०५/७०० या सुमारे ३२ कि.मी. रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून मंजूर निविदेनुसार सदर काम डिसेंबर २०१९ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

तसेच खुलताबाद-म्हैसमाळ या प्रजिमा-२१ रस्त्याच्या कि.मी.०/०० ते ११/५०० मधिल काम प्रगतीपथावर असून सदर काम मंजूर निविदेनुसार जुलै २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) येथील वाशिम नाका ते चिंचेच्या झाडापर्यंतचा दोन कि.मी.रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबत**

**(५०) १४२३८६ (१३-०७-२०१९). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) येथील वाशिम नाका ते चिंचेच्या झाडापर्यंतचा दोन कि.मी. रस्ता नगरपालिकेने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या सर्वसाधारण सभेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नगरपालिकेकडे घेण्याचा ठराव केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठरावाची अंमलबजावणी न झाल्यामुळे व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने माहिती घेवून हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नगर पालिकेकडे वर्ग करुन या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१९) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) सदरचा रस्ता अवर्गीकरणाचे निकष पूर्ण करीत नाही. दुरूस्तीबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.